चाणक्य मंडल परिवार




# MPSC

## प्रचलित घडामोडी

## *स्पेशल कोर्स (मराठी)*

Headlines: ८ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर २०१९

१४ ऑक्टोबर २०१९

# हेडलाईन्स

## नोबेल पारितोषिक – 2019

- जगातील अत्यंत प्रतिष्ठेच्या नोबेल पुरस्कारांची नुकतीच घोषणा झाली.
- जीवशास्त्र/वैद्यकशास्त्र : वि. केलीन ज्युनियर, सर रॅटक्लीफ, ग्रेग सेमेन्झा
- रसायनशास्त्र : जॉन गुडइनफ, स्टॅनली व्हाईटिंघम, अकिरा योशिनो
- भौतिकशास्त्र : जेम्स पिबल्स, मायकल मेयर, डिडर क्वीलीझ
- साहित्य : ओल्का तोकार्झुक, पीटर हँडके
- शांतता : अबिय अहमद अली (इथियोपियाचे पंतप्रधान)

**नोबेल पुरस्कार :**

- रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, साहित्य, जागतिक शांतता, वैद्यकशास्त्र किंवा जीवशास्त्र आणि अर्थशास्त्र या क्षेत्रांत अतुलनीय कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो.
- स्वीडिश वैज्ञानिक 'आल्फ्रेड नोबेल' यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देतात.
- सुरुवात : 10 डिसेंबर, 1901
- 1969 पासून स्वीडनच्या स्विस बँकेनेही अर्थशास्त्रासाठी नोबेल देण्यास सुरुवात केली.
- 'सहा' क्षेत्रांसाठी नोबेल पुरस्कार दिला जातो.

**पुरस्काराचे स्वरूप :**

- 14 लाख डॉलर व प्रशस्तीपत्रक

| पुरस्काराचे क्षेत्र | कोणातर्फे दिला जातो : |
|---|---|
| • भौतिकी रसायनशास्त्र | द रॉयल स्वीडिश |
| • अर्थशास्त्र | अॅकॅडमी ऑफ सायन्स |
| • वैद्यकशास्त्र | द रॉयल कॅरोलिन मेडिको सर्जिकल इन्स्टिट्यूट |
| • साहित्य | द स्वीडिश अॅकॅडमी |
| • शांतता | नॉर्वेजियन नोबेल कमिटी |

- वरील पारितोषिकांसंबंधी निर्णय घेण्याचा व तो जाहीर करण्याचा हक्क संबंधित संस्थांना आहे.

**महत्त्वाचे :**

- आत्तापर्यंत भारतातील 5 व्यक्तींना हा पुरस्कार मिळाला आहे. (पुरस्कार मिळतेवेळी भारतीय नागरिक असलेले)
- रविंद्रनाथ टागोर (1913, साहित्य)
- 2014 चा शांततेचा नोबेल – कैलास सत्यार्थी–
- 2019 चा शांततेचा नोबेल इथिओपियाचे पंतप्रधान अबिय अहमद अली यांना मिळाला. इथियोपियाचा इरिट्रियासोबतचा सीमावाद सोडविण्यासाठी पुढाकार

## 16 वर्षीय ग्रेटा थनबर्ग हिला 'राईट लाईव्हलीहुड' पुरस्कार जाहीर

- स्वीडनमधील पर्यावरणवादी कार्यकर्ता ग्रेटा थनबर्ग हिला राजकीय व जागतिक स्तरावर हवामान बदलाविषयी आवाज उठवून एक जगद्व्यापी चळवळ उभारल्याबद्दल 'क्रिड्स् राईट्स्' या हॉलंडच्या बालसंरक्षण संस्थेने 'राईट लाईव्हलीहुड' या पुरस्काराने सन्मानित केले. हा पुरस्कार पर्यायी नोबेल म्हणून ओळखला जातो.
- न्यूयॉर्कमध्ये आयोजित केलेल्या जागतिक हवामान परिषदेमध्ये तिने हवामान बदलाविषयी आमसभेतील नेत्यांपुढे आवाज उठविला.
- पर्यावरणासाठी तिने 2018 साली स्वीडनच्या संसदेसमोर दर शुक्रवारी आंदोलन सुरू केले होते. ग्रेटाच्या या आंदोलनाला "फ्रायडेज फॉर द फ्यूचर" हे नाव मिळाले आहे.
- या वर्षीच्या शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठीदेखील तिला नामांकन प्राप्त झाले होते.

## महाराष्ट्रात लायगो प्रयोगशाळा

- हिंगोलीतील औंढा नागनाथ तालुक्यातील दुधाळा परिसरात 'लायगो' प्रयोगशाळा उभारली जाणार आहे.
- LIGO : 'Laser Inferometer Gravitational Wave Observation

• ही अशा प्रकारची जगातील केवळ तिसरी तर अमेरिकेबाहेरची पहिलीच प्रयोगशाळा असेल.

**सध्याच्या प्रयोगशाळा :**

i) वॉशिंग्टन, ii) लुईझियाना येथे आहेत.

**कार्य :**

• गुरुत्वीय लहरींचा अभ्यास यामार्फत केला जाईल.

**गुरुत्वीय लहरी :**

• फेब्रुवारी 2016 मध्येच गुरुत्वीय लहरींचे अस्तित्त्व असल्याचे सिद्ध झाले होते.

• 1916 मध्ये आईनस्टाइन यांनी गुरुत्वीय लहरी असल्याचे भाकित त्यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताधारे केले होते.

• गुरुत्वीय लहरी अतिसुक्ष्म व अतिक्षीण असतात.

## त्रिपुरा उच्च न्यायालयाने पशुबळी या प्रथेवर घातली बंदी

• 27 सप्टेंबर 2019 ला त्रिपुरा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने राज्यातील मंदिरामध्ये जनावरे आणि पक्षी यांचा बळी देण्याच्या प्रथेवर बंदी घातली.

• याबरोबरच न्यायालयाने सरकारला सांविधानिक मूल्ये आणि सर्व पशू-पक्ष्यांप्रति करुणा, दया व प्रेम याचे महत्त्वाबद्दल लोकांमध्ये जागरूकता करण्याविषयी आदेश दिले.

**उच्च न्यायालयाने दिलेले स्पष्टीकरण :**

• जनावरांना बळी देण्याच्या प्रथेचे घटनेतील कलम 25 अन्वये संरक्षण केले जाऊ शकत नाही. धार्मिक स्वातंत्र्य हे सार्वजनिक व्यवस्था, नैतिकता आणि स्वास्थ याच्या अधीन आहे.

• याबरोबरच पशुबळी कलम 21 (जीवित स्वातंत्र्याचा अधिकार) चे उल्लंघन आहे.

• न्यायालयाने पुढे सांगितले की या धार्मिक परंपरा, पशू क्रूरता निवारण कायदा - 1960 च्या तरतुदींचे उल्लंघन करू शकत नाहीत.

## भारत, पाकिस्तान, चीन यांचे मिळून हिंदूकुश हिमालयातील हवामान बदलाविषयी कार्य

• यासाठी भारतीय हवामान संस्था, चीन व पाकिस्तानी संस्था सहभाग घेणार आहेत.

• या संयुक्त कामाद्वारे हिंदूकुश हिमालयातील हवामान बदलाचा अंदाज दिला जाईल.

• हे केंद्र जागतिक हवामान संघटनेअंतर्गत काम करेल.

**हिंदूकुश क्षेत्राविषयी :**

• याला तिसऱ्या क्रमांकाचा ध्रुव असेही म्हणतात.

• हे क्षेत्र जगातील सर्वात मोठ्या बर्फाच्छादित प्रदेशांपैकी एक आहे.

• या क्षेत्रात अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, भारत, किरगिजस्तान, मंगोलिया, म्यानमार, नेपाळ, पाकिस्तान, ताज़िकिस्तान व उझबेकिस्तान यांचा समावेश होतो.

• हे क्षेत्र 5 million वर्ग किलोमीटर पसरलेले आहे.




## 39 वे जागतिक कवी संमेलन भुवनेश्वर येथे संपन्न

• जागतिक कवी काँग्रेस - स्थापना : 1969
पहिले संमेलन 1969 मध्ये पार पडले.

• याचे आयोजन जागतिक कला आणि संस्कृती अकादमीतर्फे केले जाते.

• नुकतेच 39 वे संमेलन भुवनेश्वर, ओदिशा येथे पार पडल्यामुळे हे आपल्यासाठी महत्त्वाचे ठरते.

## सारस आजीविका मेळावा

• दीनदयाळ अंत्योदय योजनेअंतर्गत सारस आजीवन मेळावा सुरू केला आहे.

• उद्दिष्ट : देशातील ग्रामीण स्त्रियांच्या बचत गटांना एका व्यासपीठाखाली आणणे.

• त्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्यासाठी, त्यांची उत्पादने

विकण्यासाठी, खरेदीदारांशी दुवे तयार करण्यासाठी मदत करणार आहे.

- या मेळाव्याचे आयोजन CAPART (Council for Advancement of People's election and Rural Technologies) कडून केले जाते.
- या मेळाव्याचे इंडिया गेटच्या लॉनमध्ये 10 ऑक्टोबर ते 23 ऑक्टोबरच्या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.
- 200 हून अधिक स्टॉल्स उभारले जाणार असून देशभरातून 500 हून अधिक बचत गटांनी भाग घेण्याची अपेक्षा आहे.

## सुमन योजना

- सुरक्षित मातृत्व आश्वासन योजना
- उद्दिष्ट : देशातील माता मृत्युदर आणि बालमृत्युदर कमी करणे.
- या योजनेत गर्भवती महिलांसाठी मोफत औषधे दिली जातात.
- केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी ही योजना सुरू केली आहे.
- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्त्व अभियानाअंतर्गत ही योजना सुरू केली आहे.

**योजनेची वैशिष्ट्ये :**

- या योजनेअंतर्गत प्रसुतीनंतरच्या 6 महिन्यात आई, जन्मलेली मुले हे मोफत आरोग्य सेवांचा लाभ घेण्यास सक्षम असतील.
- भारत सरकारमार्फत घरापासून ते आरोग्य संस्थांपर्यंत मोफत वाहतूक सेवा दिली जाईल.

**प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान**

- हे अभियान केंद्रीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालयाने 31 जुलै 2016 रोजी सुरू केले आहे.
- प्रत्येक महिन्याच्या 9 तारखेला सर्व गर्भवती महिलांना सर्वसमावेशक व दर्जेदार निःशुल्क आरोग्य सेवा पुरविणे.

## जेमिनी (GEMINI)

- GEMINI : Gagan Enabled Mariner's Instrumental For Navigation and Information
- जेमिनी हे एक यंत्र (Device) आहे, जे आपत्ती संबंधित माहिती प्रदान करते.
- हे यंत्र किनारपट्टीपासून 10 ते 12 कि.मी. अंतरावर असणाऱ्या आपत्तींबद्दल मच्छिमारांना सूचना देण्यासाठी बनवण्यात आलेले आहे.

## ध्रुव : प्रधानमंत्री अभिनव शिक्षण कार्यक्रम

- उद्दिष्ट : विद्यार्थ्यांना विविध कौशल्य आणि विविध विषयांमधील ज्ञान यांच्याबद्दल माहिती देणे.
- ध्रुव हा 14 दिवसांचा शिक्षण कार्यक्रम आहे. तो 10 ऑक्टोबर 2019 रोजी सुरू करण्यात आला.
- या कार्यक्रमात विज्ञान आणि कला या दोन क्षेत्रांचा समावेश आहे.

## ग्रीन वॉल ऑफ इंडिया

- केंद्र सरकारकडे एक हजार चारशे किलोमीटर्स लांबीची 'ग्रीनवॉल' उभारण्याचे प्रस्तावित आहे.

**कशासाठी :** i) पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी
ii) हरित क्षेत्र वाढवण्यासाठी

**वैशिष्ट्ये :**

- या अंतर्गत 1400 कि.मी. लांबीचा व 5 किमी रुंदीचा एक नैसगिक हरित पट्टा तयार केला जाणार.
- थारचे वाळंवटातून ही हरित भिंत विकसित केली जाईल.

**होणारा फायदा :**

i) वाढत्या प्रदूषणाला आळा बसेल.
ii) अरवली डोंगरांदरम्यानच्या कमी होणाऱ्या हति पट्ट्यावर प्रभावी ठरेल.
iii) पश्चिम भारत व पाकिस्तानातील वाळवंटातून दिल्लीत येणारी धूळ रोखली जाईल.

**महत्त्वाचे :**

i) हा प्रकल्प आफ्रिका खंडातील 'ग्रेट ग्रीन वॉल ऑफ सहारा' च्या धर्तीवर आधारित असेल.
ii) सध्या मात्र हा प्रकल्प प्राथमिक टप्प्यात असून मंजूर झालेला नाही.

## जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांक, 2019 (Global Competitiveness Index, 2019)

- या यादीत भारत 68 व्या क्रमांकावर आहे.
- भारताचे स्थान 2018 च्या तुलनेत 10 स्थानाने खाली गेले आहे. 2018 च्या यादीत 58 वा होता.
- पहिल्या पाच क्रमांकाचे देश
  1. सिंगापूर
  2. यूएस
  3. हाँगकाँग
  4. नेदरलँड
  5. स्वित्झर्लंड
- हा निर्देशांक World Economic Forum या संस्थेकडून दरवर्षी प्रकाशित केला जातो.

## क्रिप्टोकरन्सीद्वारे देणगी स्वीकारणारी संयुक्त राष्ट्रसंघाची पहिली संस्था : UNICEF

- युनिसेफ ही क्रिप्टोकरन्सीद्वारे देणगी स्वीकारणारी संयुक्त राष्ट्र संघाची पहिली संस्था बनली आहे.
- युनिसेफ ही बिटकॉइन आणि इथर यासारख्या क्रिप्टोकरन्सीद्वारे देणग्या प्राप्त करण्यासाठी तसेच त्या वितरित करण्यासाठी सक्षम बनली आहे.
- यामुळे जागतिक स्तरावर बालकांचा आणि तरुणांचा मोठ्या प्रमाणावर विकास करणे शक्य होईल.

**UNICEF : United Nations International Children's Emergency Fund (संयुक्त राष्ट्र बालनिधी)**

- स्थापना : 11 डिसेंबर 1946
- 1953 संयुक्त राष्ट्र संस्थेत कायमस्वरूपी दर्जा.
- 191 देशात कार्यरत.
- मुख्यालय : न्यूयॉर्क
- कार्यक्षेत्रे :

i) बालकांचा विकास आणि संरक्षण

ii) मुलभूत शिक्षण आणि समानता

iii) धोरण निर्मिती आणि भागीदारी

- 1979 : युनिसेफने 'बालकांचे वर्ष' म्हणून घोषित केले.

## दिनविशेष

## 9 ऑक्टोबर : जागतिक टपाल दिवस

**सुरुवात** : 1969

**उद्देश :**

- दैनंदिन जीवनामध्ये असलेली पत्रसेवेची भूमिका आणि त्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये टपालसेवेचे योगदान याविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करते.
- सन 1874 मध्ये 9 ऑक्टोबर रोजी युनिव्हर्सल पोस्टल युनियन (UPU) ची स्थापना करण्यात आली होती.

**युनिव्हर्सल पोस्टल युनियन**

- मुख्यालय : बर्न (स्वित्झर्लंड)
- भारत 1876 साली UPU चा सदस्य बनणारा पहिला आशियायी देश आहे.
- भारतात डाक व्यवस्थेची सुरुवात 1766 मध्ये रॉबर्ट क्लाईव्ह याने केली व तिचा विकास वॉरन हेस्टिंग याने 1774 मध्ये कोलकाता पोस्ट ऑफिस स्थापन करून केला.
- लॉर्ड डलहौसी याने 1 ऑक्टोबर 1854 साली भारत सरकार डाक विभागाची स्थापना केली.
- भारतात पिनकोडची सुरुवात 15 ऑगस्ट 1972 ला झाली.

## 11 ऑक्टोबर : आंतरराष्ट्रीय बालिका दिवस

- उद्देश : मुलींच्या अधिकाराविषयी जागरूकता निर्माण करणे. त्यांना शिक्षण, पोषण, स्वास्थ्य सुविधा, कायदेशीर अधिकार यांची माहिती देणे. तसेच भेदभाव यांच्यापासून संरक्षण देणे.
- हा दिवस संयुक्त राष्ट्राकडून साजरा केला जातो.
- प्रथम 11 ऑक्टोबर 2012 ला हा दिवस साजरा केला गेला.

**मुलींसाठीच्या योजना व तरतुदी :**

**1) सुमतीबाई सुकळीकर महिला उद्योगिनी योजना**

- सुरुवात : 14 ऑक्टोबर 2016
- या योजनेद्वारे महिला बचत गटांची उभारणी केली जाते.
- या बचत गटांना विविध उद्योग व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

**2) माझी कन्या भाग्यश्री योजना**

- सुरुवात : 13 फेब्रुवारी 2013
- उद्देश : राज्यातील मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, बालविवाहास प्रतिबंध करणे.
- ज्याचे उत्पन्न 7.50 लाख रुपयांच्या मर्यादेत आहे, त्यासाठी सर्व कुटुंबातील पहिल्या दोन मुली अपत्यांसाठी ही योजना लागू आहे.
- एकुलत्या एका मुलीच्या खात्यात 50 हजार रु. तर दोन मुलींच्या खात्यात 25000 प्रत्येकी जमा केले जातात.

**3) मनोधैर्य योजना**

- सुरुवात : ऑक्टोबर 2013
- उद्देश : बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्यात बळी पडलेल्या महिलांना व त्यांच्या वारसदारांना मदत व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी.

**4) अहिल्याबाई होळकर मुलींना मोफत बस पास योजना**

- सुरुवात : जून 1996
- महाराष्ट्र शासन व राज्य परिवहन महामंडळाची योजना
- 5 वी ते 10 वी च्या मुलींना एस. टी. पास मोफत देण्यासाठीची योजना.

**5) प्रधानमंत्री मातृवंदना योजना**

- सुरुवात : 1 जानेवारी 2017
- केवळ पहिल्या अपत्यासाठी ही योजना लागू आहे.
- 5000 रु. पर्यंतची रक्कम तीन टप्प्यांत संबंधित लाभार्थी स्त्रीच्या खात्यात जमा केली जाते.

**6) बेटी बचाओ बेढी पढाओ योजना**

- सुरुवात : 22 जानेवारी 2015
- ही योजना केंद्र सरकारने सुरू केली.
- उद्देश : मुलींबाबतची असणारी अनास्था थांबवून लिंग निवडीस प्रतिबंध करणे, बालिका भ्रूण हत्या रोखणे.
- मुलींच्या शिक्षणाबाबत व त्यांच्या जीवनमानाबाबत खात्री देणे.

**7) APJ अब्दुल कलाम अमृत आहार योजना**

- सुरुवात : 18 नोव्हेंबर 2015
- अनुसूचित जाती जमातीतील गरोदर महिलांसाठी योजना
- त्यांना गरोदरपणात शेवटच्या तिमाहीत व बाळंतपणा नंतरच्या तिमाहीत चौरस आहार देणे.
- बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी ही योजना राबविली जाते.

**8) उज्ज्वला योजना**

- सुरुवात : 2008
- स्त्रिया आणि मुलींच्या अनैतिक व्यापार वाहतुकीला आळा घालण्यासाठी.
- त्यांना संरक्षण, शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करणे.

**9) प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**

- सुरुवात : 1 मे 2016
- पेट्रोलियम व गॅस मंत्रालयाची योजना
- 2019 पर्यंत 5 कोटी महिलांना LPG कनेक्शनचा लाभ देण्यासाठी.

**महिला व बालकांसाठी घटनात्मक तरतूदी :**

- कलम 15 (3) नुसार राज्यसंस्था महिला व बालकांसाठी कोणतीही विशेष तरतूद करू शकते.
- कलम 39 (A) स्त्री व पुरुष नागरिकांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळविण्याचा हक्क सारखाच असावा.
- कलम 39 (C) स्त्री व पुरुषांना समान कामाबद्दल समान वेतन.

## आरेतील वृक्षतोड

- मेट्रो कारशेड बनविण्यासाठी आवश्यक जागेची पूर्तता करण्यासाठी 'एमएमआरसीएल'कडून मुंबईतील 'आरे' जंगलातील सुमारे 3000 झाडांची कत्तल केली गेली.
- MMRCL : Mumbai Metro Rail Corporation Limited
- आरे जंगलास 'मुंबईचे फुफ्फुस' असे संबोधले जाते.
- मुंबई उच्च न्यायालयाने आरेतील वृक्षतोड करण्यास परवानगी दिली होती. मात्र पर्यावरण प्रेमींकडून यास विरोध झाला.
- एका विद्यार्थ्याने याकडे लक्ष वेधण्यासाठी सर न्यायाधीशांना एक पत्र लिहिले. सर्वोच्च न्यायालयाने या पत्राचे जनहित याचिकेत रूपांतर करीत यासाठी विशेष पीठ स्थापन केले आणि या वृक्षतोडीवर तात्काळ स्थगिती आणण्याचे आदेश दिले.

**न्यायालयाचा 'सुओ मोटो' अधिकार :**

- सर्वोच्च व उच्च न्यायालयांचा पर्यवेक्षणात्मक अधिकार क्षेत्राअंतर्गत (Supervisory Jurisdiction) 'सुओ मोटो' या अधिकाराचा समावेश होतो.

- म्हणजेच न्यायालय 'स्वयंप्रेरणेने' एखाद्या बाबीचे जनहित याचिकेत रूपांतर करू शकते.

**जनहीतयाचिका :**

- सामाजिक हितासाठी न्यायालयाकडून दाद मागण्यासाठीची ही प्रक्रिया आहे.
- ही भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे 17 वे मुख्य न्यायाधीश पी.एन.भगवती यांनी स्थापित केली.
- उद्देश : सामाजिक हित साध्य करण्यासाठी न्यायव्यवस्थेला लोकाभिमूख बनविणे.

**राष्ट्रीय हरित लवाद (National Green Tribunal) :**

- 'राष्ट्रीय हरित प्राधिकरण अधिनियम 2010' अन्वये 'राष्ट्रीय हरित लवाद' स्थापन केले गेले.
- कार्य : पर्यावरण रक्षण व नैसर्गिक संसाधनांसंबंधीच्या वादावर निर्णय देणे.
- न्यायालयावरील भार कमी करण्याचे कार्य करते.

**NGT ची सभास्थाने :**

- मुख्य स्थान : दिल्ली
- इतर : चेन्नई, पुणे, भोपाळ, कोलकाता

**महत्त्वाचे :**

- यापूर्वीच पर्यावरणीय मुदद्यावरून महाराष्ट्रातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प, नाणार प्रकल्प रखडले आहेत.
- उपलब्ध माहितीनुसार, पर्यावरण मंत्रालयाने 2014-2019 या काळात तब्बल 1.10 कोटी वृक्ष तोडण्यास परवानगी दिली होती.

# आरे जंगल आणि समस्या

महाराष्ट्रात एकीकडे निवडणुकीचे वातावरण तापलेले असतानाच 'आरे कॉलनी' तील वृक्षतोडीमुळे हा विषयही पुन्हा चर्चेला आला आहे. मुंबईत होऊ घातलेल्या मेट्रोसाठी पार्किंग डेपो बांधण्यासाठी आरे कॉलनीचा काही भाग वापरण्यात येणार आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरण प्रेमींमधील नाराजी व त्यावरील सरकार आणि न्यायालयाची भूमिका, सर्वांचा एकत्रित परिणाम या संदर्भातील थोडक्यात आढावा :

**आरे कॉलनी :**

नेमकी कुठे : संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्याच्या दक्षिणेला आरे कॉलनी वसलेली आहे. या परिसरात पवई तलाव, विहार सरोवर हे तलाव, फिरण्यासाठी उद्याने आणि जवळच दादासाहेब फाळके चित्रपटनगरीही आहे.

**सुरुवात व सद्यस्थिती :**

मुंबईच्या गोरेगाव उपनगराचा भाग असलेला हा भूभाग 1951 साली सरकारच्या दुग्धव्यवसाय विकास विभागाकडे देण्यात आला होता. परंतु यातील मर्यादित भागावरच गाई-म्हशींचे गोठे आणि कुरणं उभारण्यासाठी परवानगी मिळाली व बाकी भागात जंगल उभे राहिले.

मुंबईची महत्त्वाची ड्रेनेज सिस्टिम मानली जाणारी मिठी नदीही याच जंगलातून वाहते.

या परिसरात बिबट्या, अजगर असे अनेक जंगली प्राणी, विविध कीटक प्रजातींचा अधिवास आहे.

आरे कॉलनीत जवळपास 29 अदिवासी पाडे असून त्यांचं आयुष्य मुख्यत: जंगलावर अवलंबून आहे.

**याआधीही वृक्षतोडीविरोधात नाराजी :**

आरे कॉलनीत उभा राहणारा 'मेट्रो' हा एकमेव प्रकल्प नसून याआधी देखील आरे कॉलनीच्या 1300 हेक्टर क्षेत्रापैकी 40 हेक्टर भाग प्राणीसंग्रहालयाच्या उभारणीसाठी देण्याचे जाहीर झाले होते. यामुळे वन्यजीवन नष्ट होईल व संजय गांधी उद्यानावरही त्याचे परिणाम होतील या भीतीने पर्यावरण प्रेमींनी आरे वृक्षतोडीला विरोध केला होता.

**नक्की आरे प्रकरण काय? :**

- 2014 मध्ये वर्सोवा ते घाटकोपरपर्यंत 'मेट्रो' ची चर्चा.
- त्यामुळे मेट्रोला लागणाऱ्या पार्किंगसाठी 'आरे'ची निवड.
- या परिसरातील झाडे कारशेडला अडथळा ठरू लागल्याने त्यांना तोडण्याचा निर्णय.
- याला सर्वच स्तरातून विरोध झाल्याने राज्य सरकारने पर्यायी जागा शोधण्याचा निर्देश दिला.
- मात्र एवढी जागा उपलब्ध न झाल्याने कंपनीने पुन्हा 'आरे'चीच निवड केली.
- त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी न्यायालयात धाव घेतली.
- सर्वोच्च न्यायालय व हरित लवाद यामध्ये खटला सुरू असल्याने पुनरावृत्तीच्या मुद्द्यावरून मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली.
- याआधी राष्ट्रीय हरित लवादच्या पुणे बेंचने २०१६ मध्ये 'आरे' परिसरात कारशेडची परवानगी नाकारली होती. मात्र वन विभागाने 'आरे' कॉलनीला वनक्षेत्र मानण्यास नकार दिल्याने लवादाने केंद्र सरकारची जमीन सोडून राज्य सरकारच्या जमिनीवर कारशेड बनविण्यास परवानगी दिली होती.

**उच्च न्यायालयाचा निर्णय :**

'आरे कॉलनी वनक्षेत्रात असूनही त्यावर बांधकाम करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कॉलनीला संरक्षित वनक्षेत्र घोषित करण्याची विनंतीही दुर्लक्षिली जात आहे. त्यामुळे या संदर्भात सरकारला निर्देश द्यावेत अशी याचिका पर्यावरणप्रेमींनी दाखल केली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने तांत्रिक कारणांमुळे फेटाळून लावली व सर्वोच्च न्यायालयात जाण्याची शिफारस केली.

मात्र याचिका फेटाळल्यानंतर त्या रात्रीतच वृक्षतोड करण्यात आल्याने प्रकरण चिघळले.

**सरकार आणि पालिकेचा युक्तिवाद :**

- केवळ हिरवळीमुळे हा परिसर वनक्षेत्र ठरत नाही. 1948 पासूनच इथे अनेक बांधकामे झाली आहेत. विविध भूखंड सरकारी आस्थापनांना हस्तांतरित झाले आहेत.
- त्यामुळे आरे कॉलनीला वनक्षेत्र म्हणता येणार नाही आणि तो संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भागही नाही.
- याआधीही उच्च न्यायालयात हा मुद्दा उपस्थित झाला होता व न्या. सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या खंडपीठाने तो फेटाळला होता.
- 1997 च्या गोदावर्मन विरुद्ध केंद्र सरकार या प्रकरणाचा सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याप्रमाणे वन संरक्षणाचा प्रश्न याचिकादारांनी सर्वोच्च न्यायालयात मांडावा असाही युक्तिवाद सरकारतर्फे करण्यात आला.

**पर्यावरणप्रेमींचा आणि याचिकादारांचा युक्तिवाद :**

- आरे कॉलनीतील नैसर्गिक वनसंपदा व त्यावर अवलंबून असलेल्या आदिवासी पाड्यांचा विचार व्हावा.

- मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास.
- आरे कॉलनीला संरक्षित वनक्षेत्र घोषित करण्यासाठी (भारतीय वन कायदा, 1927 च्या कलम 4 अन्वये)
- अनेक प्रस्ताव सादर केले असूनही ही जमीन संरक्षित वनक्षेत्र म्हणून घोषित करणारी अधिसूचना सरकारने काढली नाही.
- आरे कॉलनी आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान नैसर्गिकदृष्ट्या एकाच जंगलाचा भाग असल्यामुळे दोन्हींचे संवर्धन महत्त्वाचे.

**MMRC चे स्पष्टीकरण (Mumbai Metro Rail Corporation) :**

- मुंबई मेट्रोमुळे पर्यावरणाचा फायदाच.
- मेट्रोमुळे साडेसहा लाखांच्या आसपास वाहनं रस्त्यावर येणार नाहीत. खासगी वाहनांऐवजी मेट्रोचा वापर.
- त्यामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमीच होईल.

**मेट्रोवरून राजकारण :**

- कारशेडसाठी आरे कॉलनीची जागा देण्यास भारतीय जनता पक्षाचे मित्रपक्ष म्हणजे शिवसेनेसोबतच मतभेद.
- तसेच वृक्षतोडीविरोधात विरोधी पक्षांबरोबरच अन्य सामाजिक कार्यकर्त्यांकडूनही आवाज उठवला जात आहे.

**कलम 144 :**

- एका रात्रीत 2238 झाडे कापण्यास सुरुवात झाल्यानंतर याविरोधात नागरिकांनी ‘चिपको आंदोलन’ व ‘आरे वाचवा’ मोहीम सुरू केली. त्यामुळे ‘फौजदार प्रक्रिया संहिता’ कलम 144 नुसार तेथे जमावबंदी लागू करण्यात आली होती. त्यानुसार अनेक आंदोलकांना अटकही करण्यात आली होती. आता त्यांची सुटका करण्यात आली आहे.

**सद्यस्थिती :**

- एका कायद्याच्या विद्यार्थ्याचे पत्रच याचिका म्हणून सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेत न्यायमूर्ती अशोक भूषण व अरुण मिश्रा यांनी याचिकेची सुनावणी 21 ऑक्टोबरला ठेवली आहे व वृक्षतोडीला तात्पुरती स्थगिती दिली आहे.

**अंतिमत:**

- आरेतील तीन हजार वृक्ष गेले तर एकूण वनसंपदेला किती धोका निर्माण होऊ शकतो याचा विचार करून हे वृक्ष देत असणारा प्राणवायू आणि मेट्रोच्या अंतिम टप्प्यानंतर किती कार्बन उत्सर्जन कमी होईल याचा तुलनात्मक विचार करणे गरजेचे आहे.
- कारण पर्यावरण रक्षण, वृक्षसंवर्धन हे मोलाचे असले तरी सध्याच्या विकासाच्या व सुरक्षित प्रवासासारख्या जीवनावश्यक सोयी पुरवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे सध्या तरी निकालाची अंमलबजावणी हेच सर्वांच्या हिताचे ठरेल.